निर्लेखित करावयाच्या वाहनांच्या दरपत्रकाकरिता अटी व शर्तीचा मसूदा

अ.क्र.	नियम व अटी
१	दोन स्वतंत्र मोहोरबंद पाकीटात दरपत्रके समक्ष/ पोस्टाद्वारे **दिनांक १७/११/२०२६ ते दिनांक २३/११/२०२६** या कालावधीत सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यावर **"प्रत्येक वाहनाकरिता वाहन क्रमांकाचा स्पष्ट उल्लेख असाव (उदा.MH-०१-AN -****)"** या वाहनाच्या खरेदीसाठी दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख असावा.
२	**"जशी आहेत तशा स्थितीत"** विक्री करिता असलेली वाहने हे तपासणीसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ येथे तळघरात ठेवण्यात आली आहेत.
३	ज्यांना रजिस्टर पोस्टाने दरपत्रके पाठवावयाची आहे, त्यांनी दरपत्रक कोणत्याही परिस्थितीत दिनांक २३/११/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होती याची दक्षता घ्यावी अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.
४	इसारा रक्कम रू.२,०००/- (प्रत्येक दरपत्रकास) "S.O. Cum D.D.O Vidhan Bhavan Mumbai " यांचेकडे डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी.
५	इसारा रक्कम भरल्यानंतर "S.O. Cum D.D.O Vidhan Bhavan Mumbai" यांचेकडून प्राप्त झालेली पावती, दरपत्रकाच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसारा रक्कम भरल्याबाबतचा पुरवा सोबत सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.
६	दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रकाधारकास किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल.
७	यशस्वी दरपत्रक ठरल्यानंतर रोख रक्कम भरून एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे दरपत्रक रद्दबातल ठरविला जाईल व इसराऱ्याच्या रक्कमेचा परतावा मिळण्यास मुकावे लागेल.
८	यशस्वी खरेदीदाराने मोहरबंद पाकीटामध्ये नमूद केलेल्या वाहनांच्या खरेदीच्या रकमेच्या २५ टक्के इतकी रक्कम विक्रीच्या दिवशी अथवा लगतच्या दोन दिवसात बयाणा रक्कम म्हणून "S.O. Cum D.D.O Vidhan Bhavan Mumbai " यांचेकडे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल. खरेदीच्या दिनांकापासून ३ दिवसांचे आत उर्वरित रक्कम भरुन संबंधित वाहन उचलले नाही तर संबंधित खरेदीदाराचे नाव रद्द करण्यात येईल व बयाणा रक्कम (वाहनाच्या खरेदीच्या रकमेच्या २५% इतकी रक्कम) ही रक्कम जप्त करण्यात येऊन ती शासन जमा करण्यात येईल. तसेच संपूर्ण रक्कम भरल्यानंतर वाहन उचलण्यास विलंब केल्यास प्रतिदिनी रुपये ५००/- याप्रमाणे त्यांचेवर दंड आकारणी करण्यात येईल.

९	वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवाकर (GST) भरावा लागेल तसेच वस्तु व सेवाकर (GST) भरल्याचा पुरवा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास सादर करावा लागेल.
१०	दरामध्ये तसेच दरपत्रकाच्या कागदपत्रात कोठेही खाडाखोड, अतिरिक्त शब्द, पांढरी शाई, इ.वापरणे टाळावे चुकून अशी परिस्थिती उद्भवल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार **सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** हे राखून ठेवत आहेत.
११	वाहन विक्री संदर्भातील सर्व कार्यवाही **मा. सचिव-४ यांचे निदेशानुसार करण्यात येत असल्याने वाहनांच्या विक्री प्रक्रियेच्या संदर्भात काही वाद (Dispute) निर्माण झाल्यास सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचा निर्णय अंतिम राहील.**
१२	महाराष्ट्र विधामंडळ सचिवालयाच्या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी दरपत्रकधारकास स्वखर्चाने करावी लागेल.
१३	**कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचेकडे राहील.**

- **वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-**

१) MH-०१-AN-२३२४ (कोरोला ॲल्टीस) ची रू.१,५२,६६६/- इतकी खरेदीची किंमत होईल.

अ.क्र.	वाहनाचा तपशील
१	Vehicle : MH01AN2324
२	Model : CORORLLA ALTIS 1.8 V (SALOON)
३	Engine No : 2ZR0939900
४	Chassis No:MBJ53REE204602611
५	Class : LMV
६	MFG CD : TOYKIR
७	Product Year (Vehicle Purchase): 2012
८	आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : KM

२) MH-०१-AN-८९९८ (टोयोटा इनोव्हा) ची रू.२,५२,४६७/- इतकी खरेदीची किंमत होईल.

अ.क्र.	वाहनाचा तपशील
१	Vehicle : MH01AN8998
२	Model : INNOVA 2.5V (E4)
३	Engine No : 2KDS556486
४	Chassis No:MBJ11JV4007539635
५	Class : LMV
६	MFG CD : TOYKIR
७	Product Year (Vehicle Purchase): 2015
८	आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : KM

..३/-

३) MH-०१-ZA-९८०० (होन्डा सिटी) ची रू.५५,६५७/- इतकी खरेदीची किंमत होईल.

अ.क्र.	वाहनाचा तपशील
१	Vehicle : MH01ZA9800
२	Model : Honda City
३	Engine No :
४	Chassis No:
५	Class :
६	
७	Product Year (Vehicle Purchase): 2010
८	आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : KM

४) MH-०१-AD-१०१ (होन्डा सिटी) ची रू.५५,६५७/- इतकी खरेदीची किंमत होईल.

अ.क्र.	वाहनाचा तपशील
१	Vehicle : MH01AD101
२	Model : Honda City
३	Engine No :
४	Chassis No:
५	Class :
६	
७	Product Year (Vehicle Purchase): 2010
८	आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : KM

- **दरपत्रकधारकांनी सादर करावयाची कागदपत्रे :**

१. खरेदीदाराने दोन पासपोर्ट फोटो.

२. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ.यापैकी कोणतेही एक.)

३. कंपनी/ फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तु व सेवाकर (GST) अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४. इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक

- **दरपत्रक पाठविण्याकरिता पत्ता:**

कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

- **महात्वाच्या दिनांक व वेळ :**

१. दरपत्रके सादर करण्याचा पहिला दिनांक १७ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून.

२. दरपत्रके सादर करण्याचा शेवटचा दिनांक २३ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत.

३. दरपत्रके उघडण्याकरिता दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता.